REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2018

# अरूण कोलटकर :ज्ञातीचे कुंपण ओलांडलेला कवी



**प्रा.डॉ.राजशेखर शिंदे**
**मराठी विभाग प्रमुख , दयानंद कला महाविद्यालय,सोलापूर.**

## अरूण कोलटकरांचे काव्य आणि व्यतिमत्व :

अरूण कोलटकर (जन्म 01.11.1932 ते मृत्यू 25.09.2004) यांनी 1954 मध्ये काव्यलेखनाला सुरूवात केली. त्यांची कविता सत्यकथा, युगवाणी, छंद या नियतकालिकांमधून असो, शब्द, अथर्व या अनियतकालिकांमधून प्रकाशित झालेली आहे. या नियतकालिकामधून प्रकाशित होणारी कविता पुस्तकरूपाने प्रकाशित होण्यासाठी जवळपास अडीच दशके लागली. सन 1977 मध्ये 'अरूण कोलटकराच्या कविता' प्रकाशित झाल्या. त्यानंतर पुन्हा 2002 मध्ये 'चिरीमिरी' हा संग्रह उशिरानेच प्रकाशित झाला. त्यानंतरचे संग्रह मात्र – 'चिरीमिरी' (2003), 'भिजकी वही' (2003),'अरूण कोलटकरच्या चार कविता' (2006) एका तडफेच्या वेगाने प्रकाशित झाले आहेत.'जेजुरी' हा इंग्लिश भाषेतील संग्रह(1976) प्रकाशित होऊन आंतरराष्ट्रीय पातळीवर कोलटकरांच्या काव्यजाणिवेचा आणि शैलीचा बोलबाला झाला होता. त्यातील कवितांचे स्वतः अरूण कोलटकरांनीच मराठीत भाषांतर केले होते, त्याचे 2010 मध्ये पुस्तकरूपाने मरणोत्तर प्रकाशित झाले. मराठी इतकेच इंग्लिशमधूनही त्यांनी काव्यलेखन केले आहे. 'जेजुरी' (1976), 'सर्पसत्र'(2003), 'द बोट–राईड ॲंड पोएम्स' (2009), 'काला घोडा पोएम्स' (2004) हे इंग्लिशमधील कवितासंग्रह आहेत. त्यांच्या या एकंदर काव्यातूल अपूर्व अशा काव्याचे, काव्यजाणिवेचे,त्यांच्या या एकंदर काव्यातून अपूर्व अशा काव्याचे, काव्यजाणिवेचे, संवेदनेचे व आशयाचे दर्शन घडते; ते या लेखात पहावयाचे आहे.

'जेजुरी' ला 1977 चे राष्ट्रकुल पारितोषिक मिळाले, त्याच वर्षी त्यांचा मराठीमधील 'अरूण कोलटकरच्या कविता' हा संग्रह प्रकाशित झाला. रेगे, मर्ढेकर यांच्या काव्यावरील दुर्बोधतेचा शिक्का अजून पुसला गेला नव्हता; अशा काव्याच्या नवजाणिवेच्या काळात चित्रे कोलटकर यांची कविता सुसांडपणे पुढे येत होती आणि ती अर्थपूर्ण व आशययुक्त होती. त्याच सुमारास कोलटकरांना राष्ट्रकुल हा मानाचा पुरस्कार लाभल्याने त्यांच्या कवितेकडे गंभीरपणे पाहून आकलन होऊ लागले. कोलटकरांच्या कवितेने अर्थनिर्णय देण्यास पुरस्काराची अशा पध्दतीने मदत झाली. त्यांना 1995 मध्ये बहिणाबाई प्रतिष्ठानचा पुरस्कार, 2005 मध्ये 'भिजकी वही' संग्रहास साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त झाला.

अरूण कोलटकर जाहिरातक्षेत्रात कार्यरत होते. त्याही क्षेत्रातील कॅग ॲवार्ड, हॉल ऑफ फेम या पुरस्कारांनी ते सन्मानित झाले आहेत. अरूण बाळकृष्ण कोलटकर हे निष्णात शिक्षणतज्ञ होते. सन 1947 मध्ये मॅट्रिक्युलेशननंतर कोलटकरांनी मुंबईला जे.जे.स्कूल ऑफ आर्टसमध्ये प्रवेश घेतला. आपल्या स्वभावानुसार ते वर्गात बसत नसत. शेवटच्या वर्षाच्या परीक्षेत ते पहिले आले; परंतु बाहेरून परीक्षा दिल्याने पहिले येण्याचे प्रमाणपत्र त्यांना मिळाले नाही. नंतर त्यांनी कवितेलाच प्राधान्य दिले. चित्राला कवितेतुन मधून जपले. पुस्तकांची मुखपृष्ठे ते आनंदाने करत.कव्हरव्हॅल्यू त्यांना ठाऊक होती. दिलीप चित्रे, आदिल जसवाला, अरविंद मेहेरोत्रा यांच्या पुस्तकांना त्यांनी 'कव्हर्स' दिले आहेत. गाणं ऐकण्यात आणि गाणे गाण्यातसुध्दा त्यांना रूची होती. वाद्यंही शिकले होते. या कलापेक्षा कवितेवरच त्यांचे पहिले व अमाप प्रेम होते. ते जे वाचन, करत त्याचा कवितेसाठी उपयोग करून घेण्यासाठी दक्ष असत. रामायण, महाभारत, अंकलिपी, विज्ञान, पुस्तक छपाई, शेती, इतिहास, देशोंदेशींच्या संस्कृतींवरील अनेक ग्रंथ त्यांनी वाचलेले होते. त्याची टिपणे ते काढून ठेवत. वर्तमानपत्रांची कात्रणं

वाढत. ही कात्रणं सायन्सफिक्शन, पुराण यापासून कुठल्याही विषयावरची असायची; वर्ज्य होती ती राजकीय कात्रणं. आपल्या कवितेचा अर्थ आशयगर्भ करण्यासाठी ही कात्रणं त्यांनी पूरक ठरली आहेत, असे त्यांच्या कवितेतून दिसून येते. ''कोलटकरांनी चिनी, जपानी, स्पॅनिश अशा अनेक भाषांतील, अनेक संस्कृतींमधील कवी, लेखक वाचले होते. आपण असं म्हणू शकतो की, अरूण कोलटकर हे मराठीतील थोर कवी आहेत; पण त्यांचा सगळ्या जगाशी बिनभाषेचं एक नातं आहे. हा प्रकार आपल्याकडे मध्ययुगीन संतकाव्यामध्ये दिसतो. तमिळ कवी, कन्नड कवी असोत, फकीर असो किंवा चैतन्य महाप्रभू असोत किंवा विविध भौगोलिक प्रदेशांमध्ये विखुरलेले कवी; यांचंही बिनभाषेच्या नात्यातून देशोदेशींच्या मिथकाश्रयी संस्कृतींशी त्यांच्या काव्यामुळे नाते घट्ट होत जाते. ते मराठी कवी, आहेत खरे; पण अनेक देशांतील कहाकाव्ये, त्या देशांतील समजुती, लोकांची मिथकाश्रयी लौकिक जीवनशैली सर्जनशील करणारे, प्रखर वैश्विक भानाचे व जाणिवेचे कवी वाटतात. अरूण कोलटकर, दिलीप चित्रे ह्या मोठ्या कवींना धर्म नसतो; ते बिनभिंतीच्या घरात, बिनसीमांच्या देशात राहतात–असा सार्थ गौरव भालचंद्र नेमाडे यांनी केला आहे.

## कोलटकरांच्या कवितेचे स्वरूप व जाणीवविश्व :

अरूण कोलटकरांच्या कवितेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ती कविता व्यक्तित्वाची नाही. मी–तू–ते च्या पलीकडे गेलेली, व्यक्तिगत भावविश्वाला छेद देणारी, निर्जीव वस्तूंनी भरलेली आणि या निर्जीव वस्तूकरवी तटस्थपणे देशी वळणाने कथन कोणी एकटा–दुकटा नसतो. ती मरणसांनी, बायकांनी, माकडांनी, वस्तूंनी, मिथकांनी, प्रतिमांनी, अश्रूंनी आणि दुःखाच्या ऊर्ध्वपतनांनी बजबजलेली मूकपट असते. या गर्दीने ती सळसळणारी कविता असते. हे सारे असूनही ती भावविभोर कविता नाही. रस–प्रतीती न होताही सहानुभूती देणारी ही कविता आहे. कारण कवितेमधील घटक भावनानुगामी न होता आशयनुगामी झाले आहेत.भावनेवर मात करून चिंतनाचे विशाल पट आशय करू लागतो. सजीव–नीर्जीव प्राण्यांनी भरलेले विश्व, त्यातील भावभावनां, राग–लोभ, शृंगार–गालिप्रदान, किळसपणा, जुलूम, अत्याचार आणि परंपरा व नवता हे अफाटपण पाहता परंपरेतून अनेक पिढ्यांनी लिहिलेली मालिका–कविता वाटते.या कवितेला सीमिततेचा संसर्ग झालेला दिसत नाही. म्हणून ही कविता काव्याची संकल्पना व आशयव्यूह बदलत नेऊन विश्वालाच काव्यात सामावून घेते, असे वाटते. जुन्या परंपरागत मिथकांमधून आजच्या जीवन–जाणिकवांतील कुतूहल व त्यातून कार्यकारणभाव शोध हा या कवितंचा पिंडधर्म वाटतो.

बोलीरूपाची शब्दकळा, प्रतिमांची श्रावणझाड, लोकलय व लोकछंद यामुळे ही कविता अतुलनीय वाटते. मराठीत अशी दुसरी कविता नाही.

कोलटकरांची कविता वेगवेगळ्या प्रतिमा, यमक, अनुप्रास, चेतनागुणोक्ती यांचा साजल्यालेली असते. लोककथा, लोककथागीते यांमधील लय कोलटकरांच्या कवितेत अंगभूत गुणधर्म म्हणून येते. या अंगभूत गुणधर्मामुळे त्यांची कविता कमालीची अलिप्त वाटते.

कोलटकरांच्या कवितेच्या जाणीवविश्वाचे स्वरूप संग्रहामधिक पालटलेले असते. प्रत्येक संग्रहात संकल्पित प्रकल्पाचे विश्व असते. वेगवेगळ्या भावनांची मालाकविता असते. म्हणायचेच झाल्यास, ते खंडकाव्य म्हणता येईल. अशा संग्रहातील जाणीवविश्वाचे स्वरूप आधी पाहू.

## अरूण कोलटकरच्या कविता : आत्मनिश्ठ जाणीवविश्व?

यातील कविता कवीच्या ऐन तारूण्याच्या बहरातील आहेत. त्या काळामधील एकंदर काव्य जाणिवांची छाया कवीवर पडलेली दिसून; परंतु ते अनुकरण नाही. त्या जाणिवेच्या प्रभावामधूनही कविता अनवट झालेली आहे. जुनी गाणी, दंतकथा, विशिष्ट वस्तूंना प्राप्त झालेले अर्थवलय तोडून, वेगळ्यात जाणिवेत नेऊन अर्थस्फोट करणे, ही किमया यात आहे. अनुभव आणि आशय यांची प्रतीके, चित्राच्या आणि शास्त्रीय गायनाच्या रचनापध्दतींचा अनुसर कवीच्या उदयोन्मुख अवस्थेत दिसून येतो. हॉस्पिटलमधील कविता, मृत्यूच्या जाणिवेच्या कविता, इमारत–मेणबत्तीच्या कविता अशा अचेतन वस्तुमात्रातुन सजीव चित्रनिर्मिती करण्याचा प्रयोग कवीने केलेला दिसतो. इराणी, काय डेंजर वारा सुटलाय–या प्रतीकरूपातून सामाजिक आशय सांगणाऱ्या कविता; ॲनिमेशन, खेकडे, बिल्डिंग, कांबळे, पाव, चट्टामट्टा, भूपाळी या आत्महत्येच्या कविता–अशी एक वर्गवारी सांगता येईल. विविध तंत्राचा प्रयोजक व प्रभावी वापर करून असहाय माणसाचे करूण जगणे तटस्थ निर्ममतेने मांडले

आहे. उघड विधानात्मक उल्लेख करण्याऐवजी विविध पातळ्यांवर प्रतीत होणारी विश्वबिंके कवीने नेमक्या आणि नेटक्या भाषेत व्यक्त केली आहेत.

## चिरीमिरी : परंपरेच्या रीतीची आधुनिक जीवनशैली

हा सर्वार्थाने भिन्न संग्रह आहे. आधीची आत्मनिष्ठा इथे नाही. 'द्रोण' मध्ये अभंगशैली आहे. कवीने पंरपरेची ही अभंगशैली आधुनिक पध्दतीने आत्मसात केली आहे. कधी षडाक्षरी, अष्टाक्षरी, तर कुठे लोकधाटणीतील यमाचा प्रभावी आविष्कार केला आहे.

वारीला 107 रांडा घेऊन निघालेला बळवंतबुवा आहे. हा वेश्यागमनी, चैनी आहे, परंतु एक पुण्य पदरात पाडून घेतो–तो 107 रांडांना विठ्ठलाचे दर्शन घडवितो. हा इरसाल गडी त्या अधःस्तरातील लोकांचा प्राणसखा, पालक,पिता,मित्र–जणू विठ्ठलच झाला आहे! भारतीय परंपरेत चिपद्‌विलसावादाला महत्त्व आहे. ज्ञानेश्वरांनी चिद्‌विलासवादाला आपल्या भाष्यात स्थान दिले आहे; परंतु इथे कवीने बळवंतबुवाकरवी चिपद्‌विलासवाद आणला आहे. कवीचा हा चैतन्यवाद अत्यंत न्याय आहे. बळवंतबुवा 107 रांडांना पंढरीचे दर्शन घडवितो. सोवळ्या–ओवळ्याच्या पलीकढे जाऊन अंतःकरणामधील शुध्द भक्तिरसाला महत्त्व दिले आहे. काबी कर्मकांड त्यांनी बाजूला सारले आहे. कोणताही व्यवसाय करा, परंतु मुखी नाम ठेवा–बवीने हे परंपरेचे पाईकपण बजावले आहे.

## भिजकी वही : स्त्रीदुःखाचे महाकाव्य

स्त्रीदुःखाची कड घेऊन आलेला मराठी भाषेतला हा पहिलाच संग्रह. न जाणो जगातील इतर भाषांत असे असेल काय? दुःखच थमि असेलेली ही पहिलीच दीर्घ अशी महाकाव्यात्म रचना आहे. कहाकाव्यातील नाट्य, प्रसंगोपात प्रसंग–घटना, रौद्र भयानकता, नातेसंबंधातील वीण, अटळ संघर्ष, धर्म–अर्थ–काम–मोक्ष यांची रूजवण, राजधर्म–लोकमत, व्यवहार–नीती, न्याय–अन्याय या सर्वांच्या मागे भव्यादभुतता आणि तितकीच प्रासादिकता– हे सारे पट 'भिजकी वही' मध्ये आहेत. यात स्त्रीच्या दुःसह्य दुःखाचे अनंत काळाचे दर्शन घडते. स्त्रीच्या जगण्याला वेदेनचाच आधार आहे. सार्वत्रिक अशांतता, वर्चस्वाचे प्राबल्य, परस्परांतील अविश्वास, धर्मांधांची आक्रमणशीलता, अवहेलना असे वातावरण या दुःखास कारक ठरते. अमानुष्ता, क्रौर्य, हिंसा रक्तपात, भीषणता, त्यातली अदभुतता हे नानापरीने दाखविले आहेत्र म्हणूनच हे आधुनिक काळामधील महाकाव्य आहे. त्या 393 पृष्ठांतील प्रदीर्घ अशा माला कविता आहेत.

पुराणातीन स्त्री–प्रतिमा केंद्रस्थानी आहे. मेरी, लैला, अपाला, कसांड्रा,ि वपाशा, हेलन,कण्णगी,मैमून, हाडम्मा, रजनी, किम या स्त्रियांच्या दुःखाचा शोध 'भिजकी वही'त आहे. मानवी सृष्टीच्या आरंभापासून होत असलेली स्त्रीची उपेक्षा, देवांच्याही हातून घडलेली स्त्रीची विटंबना, राजकीय–सामाजिक जीवन वास्तवाला वाटणारी स्त्रीदुःखाविषयीची उदासीनता या कवितांनी अत्यंत तटस्थपणे, परंतु अत्यंत परिणामकारक रीतीने प्रकट केली आहे. ''त्यामधुन एका व्यापक अनुभवाची सगळी परिणामणे स्पष्ट होत जातात आणि एकंदर जीवनव्यवहाराच्या विविध पैलूंचे दर्शन घडते. कवितेच्या आशयाचा विस्तारत जाणारा परिघ सामावून घेईल, अशी महाकाव्यात्म रचना करण्याची सिध्द अरूण कोलटकरांना वश होती; याचा प्रत्यय 'भिजकी वही ' च्या पानापानांवर येत राहतो.'' (विलास खोले, जून 2007 : 20)

त्रिमेरीपैकी येशूची आई ही जोसेफची वाग्दत्त वधू. तिला आत्म्यामुळे कौमार्यावस्थेत मुलगा झाला, तरीही तो ईश्वरी कृपाप्रसाद मानून जोसेफने पत्नी म्हणून मेरीचा व कौमार्यावस्थेत झालेल्या येशूचा मुलगा म्हणून स्वीकार केला. तो आपल्या या आई वडिलांकडे बारा वर्षे राहीला. पुढे त्याच्या वयाच्या तिशीपर्यंतचे चरित्र सांगणे शक्य नाही. हा पवित्र आत्म्याचा येशू दीन दलितांचा, पापी माणसांचा त्राणहारक झाला. वधस्तंभरोहणाच्या वेळी त्याची माता मेरी त्या वेळी तिथे होती. ती कोण? पापीण म्हणून उल्लेखिलेली ती मार्या की, मेरी मॅग्दालीन–हे समजत नाही तिने येशूचे पाय आपल्या अश्रूंनी धुतले, केसांनी पुसले. पायांना ॲलबस्तर हे अत्यंत सुगंधी द्रव्य लावले. तेव्हा येशूने तिचा उध्दार केला. असा उध्दार करणे येशूच्या कार्याचा भागच होता. तिसरी मेरी ही गॅलिली समुद्राच्या किनाऱ्यावरील मग्दाला या गावची होती. ती ही येशूची अनुयायी होती. वधस्तंभरोहणावेळी तीही उपस्थित होती मेरीलाच येशूच्या पुनःस्थापनेची माहिती पहिल्यांदा कळली.

कसांड्रा, हेलन, विपाशा या ग्रीक इतिहासाशी संबंध आहेत. राजा प्राथम आणि राणी हिक्यूबा यांची कसांड्रा ही मुलगी. अपोलोचे तिच्यावर प्रेम होते. अपोलोने तिला वरदान दिले होते की, तिला भविष्यकालीन घटना वर्तमानात दिसतील. कसांड्राने त्याच्या प्रेमाला प्रतिसाद दिला नाही. तिच्या भविष्यकथनावर कोणीच विश्वास ठेवणार नाही, असा शाप चिडून अपोलोने दिला. विपाशा ही निओप्लटॉनिक तत्ववेत्ती होती. ती ग्रीक तत्वज्ञानातील मोठी विदुषीही होती, गणिती होती, परंतु स्त्रीला तर शिकण्याचीच अनुमती नव्हती.

हेलन ही विश्वसुंदरी होती, तर अपाला ही अत्रीऋषींची कन्या. तिच्या सर्वांगाला कोड फुटलेले होते, म्हणून नवऱ्याने तिला सोडले. पित्याच्या घरी जाऊन इंद्राला प्रसन्नकरण्यासाठी तिने तपश्चर्या केली. इंद्राला प्रिय असणारा सोम नदीवर आणतांना तो तिने चावून पाहिला. चावण्याने झालेल्या आवाजामुळे इंद्र तिथे आला.तिने त्याला सोम दिला.पसंन्न झालेल्या इंद्राने तिची इच्छा पूर्ण केली.

'भिजकी वही' मध्ये राणीपासून सामान्य स्त्री आहे. स्त्री कोणीही आणि कोणत्याही देशातील असली, तरीही तिची वेदना व दुःख एकच आहे. तिचे स्त्रीपण हेच त्या दुःखाचे कारण आहे. तिची अवहेलना त्यामुळे होत असते. अगदी पुरातनकाळापासून हेच होत आले आहे.

'भिजकी वही' त 'शेवटचा अश्रू' अशी एक कविता आहे. या कवितेत आदिमायेमुळे प्रार्थना केली आहे. गॅलक्ष्या, गटाच्या गंधर्वनगऱ्या, गिधाडे, देव–दानव, हिंदू–मुसलमान, सुंता–वेसंती,स्वर्ग–नरक, मसीहा–चुहा, तारांगणा–वारांगणा, लाखाचे भुंगे, दीड लाखाचे भडवे–नऊ लाखी भडभुंजे, यादव्या, भाऊबंदकीचे महाभारत, ठसठसणारी शहरे, बारालवड्याचे सर्वपल्ली बॉब–ब्रह्यास्त्र, कवट्यांचा डोंगर–चेंगीजखान, नादिरशहा, त्रेसष्ट बायकांचे बीजन करणारा अफजलखान, छळ–छावण्या, शिरकाणं, सर्पसत्रं, एश्निक, क्लेझिंग, रायटा बत्तली, परशुरामाचे पृथ्वीचे निःक्षत्रियीकरण, निर्हुतू, निर्तुत्सी, निबुध्दी, निमूर्तिपूजक, धर्म, जाती, पोटजाती, युगायुगाच्या मानसिक जखमा, अस्मितेच्या गॅग्रीन, बडवे, मुल्ला, गुरव, पाद्री, शंकराचार्य, खलिफा, यक्ष, किन्नर, गंधर्व, राक्षस, देव दैत्य, असुर, भुंजे, वेताळ, प्लंबर, रूद्र, व्यास,ऊर्ध्वरिते, चंद्रयानदेव, गुंडशाह्या, दंडुकशाह्या, ठोकशाह्या, सिघर, चक्रवर्ती, फ्यूरर, अश्वत्थामे, ऐखमन, डळमळणारे, चंद्र, लाच घेणारे सहस्त्रार्जुन, अवलोकितेश्वर, उजव्या सोंडेचा गणपती,इत्यादी इत्यादी सगळी घाण असल्याचे कवीने म्हटले आहे. ही घाण वाहून नेण्याची आदिमायेकडे कवीची प्रार्थना आहे.

## सामाजिक अनुभूतीचे तिर्यक आणि औपरोधिक कथन :

कोलटकर कोणतीही भावना वा कोणतीही गोष्ट सरळपणे आविष्कृत करीत नाहीत. त्यांच्या कथनाशयाला तिरकसपणाची रीतसंगती आविष्कारात आलेली असते. आजवरील सरळ निवेदनाने तयार झालेल्या अभिरूचीमुळे अशा रीतीमधील आशयाचे नेमके आकलन झालेले नाही. त्यामुळे कोलकटरांच्या एकंदर काव्यामधील मौलिक आशयाचाा उलगडा झाला नाही. त्यांचा काव्याशय एकचा तर विनोदी आहे किंवा काही तर नवा, न कळणारा, भयंकर झोताचा आहे–असाच समज झालेला होता.'काय डेंजर वारा सुटलाय', 'इराणी','चरित्र', 'अंत, आग, दिवे, रद्दी, खेकडे, तक्ता, चट्टामट्टा, द्रोणमधील चार भाग– पृ.51–54. चिरी–मिरीमधील निरोप, तंबू, फोटो, जोहार, प्रश्न, कुलाब्याची फेरी, रूबाया, काहळा, सायन, खुरची, राग, यमाचं गाणं,आणि संपूर्ण 'भिजकी वही' संत्र मनाचा टाहो आहे. कवीने हे स्वीकारले आहेच की, समाजात अनेक गोष्टी घडणार समाजाचा चेहरा आरशात दाखविणे एवढे मात्र कलावंताच्या हाती असते. तो चेहरा दाखवितांना बर्हिमुखी व्यक्तिमत्वाचा कवी अनेक खुबीने त्या चेहऱ्यान्चे विरूप, कौर्यपूर्ण रूप दाखवितो. त्या कथनात एका परीने त्याने सुसह्यपणा लागलेला असतो, कारण तो समाजमनाचा थाट नसल्याने उपरोधपूर्ण विडंबन संगिनीसारखे जहरी होतात. ''आधुनिक जगण्यातील भ्याडपणा, विदारकता यांचे प्रत्ययकारी दर्शन कोलटकर घडवू टाकतात. याचे कारण त्यांची औपचारीक दृष्टी व भावनिकता कसोशीने टाळणारी अखंड अशी अलिप्तता. कोलटकरी उपरोध हा या रितेपणामुळे अधिक बिकट, अधिक दचकवून टाकणारा आहे. कोलटकरांच्या कवितेतील तिरकस विनोदी दृष्टीमुळे हा उपरोध अधिक भिन्न झाला आहे. त्यामळे आत्मविडंबन हे या कवितेत सहजपणे आकारते. चरित्र, काय डेंजर वारा सुटलाय– अशा कवितांमध्ये ही विनोदी दृष्टी स्पष्टपणे दिसते.'' (वसंत पाटणकर, 1998 : 14)

' काय डेंजर वारा सुटलाय' या कवितेला पाटणकर यांनी विनोदी दृष्टी प्रकट करणारी, आत्मविडंबन असणारी कविता म्हटले आहे. ही विनोदात्म रचना असणारी कविता आहे, हे खरे; परंतु आत्मविडंबन नाही. कवितेत 19 व्या शतकाच्या अखेरीस सुरू झालेल्या प्रबोधनाने विसाव्या शतकात धारण केलेल्या सामाजिक

सुधारणेच्या रूपाने अतिशय प्रत्ययकारी वास्तवदर्शी चित्र दाखविले आहे. सात कडव्यांत विकसनशील समाजाचे विदारक चित्र दाखविले आहे. कायद्याव्दारे सहिष्णूता व समता आणली. समाजरचनेच्या उतरंडीवर धक्का पोचला. सर्वनांच्या स्थानाला धक्का लागला, हादरे बसू लागले. सामाजिक सुधारणांतील बदल ज्याला कळला, तोच धूर्त पुढे गेला. आता काय करावे? प्रतिष्ठा, इभ्रत, समाजातील स्थान अशा दिङ्मूढ अवस्थेत पडलेल्यांचे तो धूर्त निरीक्षण करत आपल्यासोबत काहींना जागे करतो आहेः ''अरे तुझी टोपी/तुझी टोपी गेली खडड्यात/कपाळ पाहिलं संभाळ/काय डेंजर वारा सुटलायं ....... डोसक्यात कचरा/धूळ धूळ डोक्यात'' टोपी ही प्रतिष्ठेची प्रतिमा आहे. सुधारणेचा डेंजर वारा उत्पात माजवतोय.टोपी सांभाळण्यापेक्षा पहिल्यांदा कपाळ सांभांळले पाहीजे.

शिक्षणाचा प्रसार झाला. दलितांचे मुले शिकली. ती मोठमोठ्यापदव्या घेऊ लागली. ते अशा नाट्यपूर्ण व ठोंबपणाने सांगितले आहे : ''कुलकर्ण्यांच्या भिंतीवरल्या/डिगऱ्या डिगऱ्या फरशी वरती/ नाऱ्या नाऱ्या तुझा बाप/ सटकला की फोटोमधनं . . . '' हा सुधारणेचा 'डेंजर वारा' कुलकर्ण्यांच्या भिंतीवरच्या डिगऱ्या पाडतोय. नाऱ्याच्या घरातही फोटो होत; पण ते डिगऱ्यांचे नव्हे, तर माणसांचे आणि देवादिकांचे! हा वारा ती चित्र पाडून नाऱ्याच्या घरात डिगऱ्यांचे फोटो लावतो आहे.आता खेडूत, शेतकरी, शेतमजूर, दलित यांची मुले शिकू लागली. हा समतेचा वारा हळूहळू नव्हे, अतिवेगाने आला. सुधारणेतील बदलाचे गांभीर्य ओळखले गेले नाही. या डेंजर वाऱ्याने 'एसेस्सीचे पेपर मैदानभर पसरविले, प्रोफेसरची प्रकाशित न झालेली कविता उडून जाते.

## लिंगभावनेमधील सर्जनशीलता :

नर–मादीमधील दैहिक अनुभूती ही केवळ आपला वंश टिकविण्यासाठी असते. मानवी नर–मादीचे मीलन केवळ प्रजोत्पादनासाठी नसते; आनंदप्राप्ती हा त्यातला प्रधान हेतू आहे. कोलटकरांच्या कवितेत लिंगभावदर्शक, गालिप्रदान शब्द आले आहेत. ते विप्रलंभ शृंगार वा संभोगशृंगार आविष्कृत करीत नाहीत. त्या मीलनक्रियेनंतर येणारे खुलेपणाचे बोलणे ते कवितेत आणतात आणि लैगिंक भावना जीवनाला कशी व्यापून राहिली आहे, याचेच तणू दर्शन घडवितात. त्यांच्या सरळ कथनात, लिंगभाव शब्द उच्चारणात तुच्छता स्पष्ट जाणवते. ''कोलटकर कोठेही लिंगभावनेशी आपले नाते असल्याचे दाखवत नाहीत. याचा अर्थ लिंगभावना उपरी आहे, असा नाही, तर अमानवीमरणाकडून सर्वनाशाकडे नेणाऱ्या निर्वाणीच्या क्षणी अटळ असलेले अंतर आहे. समृध्द संस्कृतीत हे अंतर नाही आणि ज्ञान, श्रध्दा, आनंद यामुळे यातला पाशवी प्रभाव कमी होतो. पण कोलटकरांची कविता –जिचे सर्व सांस्कृतिक आधार कोसळलेले आहेत–अशा अपंग मनुष्यसृष्टीचे चित्रण करणारी कविता आहे. माणूसपण हरवून हतबल झालेल्या लुळ्या–पांगळ्या माणसांच्या जगात ही लिंगभावना अशीच विद्रुप व बिकट असणार.'' (प्रकाश देशपांडे–केजबर,1994 : 30) जन्मजात इमारत, एकटी, घाणा, चक्क, आडगावच्या हॉटेलात, टोमॅटो, घोडा, आंबा, कोंबडा, वाघ, यल्लू, अनादि, फदालेस विनंती इ. कवितां हा लिंगभाव प्रकट झाला आहे.

कोलटकर करूणार्द्र होऊन स्त्रीकडे पाहतात; 'तशा काही स्त्रीयां पुररूषांकडे वात्सल्यभावनेही पाहतात; पण एखादेला खिजवून नकोसेही करतात. कोलटकरांना स्त्रियांविषयी नुसताच कळवळा, प्रेम प्रकट केले नाही तर अतृप्त व कामतृष्णा असलेल्या स्त्रियांना संग करणाऱ्या पुरूषांच्या बायकांच्या कोंडमारा विचित्र असते. पुरूषसहवासाला आसुसलेल्या असूनही त्या उघडपणे सहचार करत नाहीत. पुरूषसत्ताक व्यवस्थेत स्त्रियांना कामभावाचे अनेकवार दमन करावे लागते.'अनाजी फदालेस विनंती' कवितेतील स्त्रीची ही अवस्था झाली असतांना लहानगा बळवंतबुवा फदालेने दिलेली भाजी घेऊन घरी जातो. अदाजीला घरातच दोन–तीन बायका असूनही रखेल आहेच. रतिक्रीडेच्या धावपडीचे सूक्ष्म निरीक्षण केले आहे. बळजबरी, अधिकारशाही, पैसा–अडका याच्या जोरावर परस्त्री मिळवूनही स्त्रीला मनमुराद आनंद देणारा पुरूष विरळाच.

महानगरात ही भावना शरीर–मनाचे केवळ शोषण करते. तेथील संवेदनाहीन जीवनशैली–कामजीवन म्हणजे शरीरावरील ताण काम करण्याची एक क्रिया असते. ''येतो पिसाट धावत/कोंबड्या बाजूला होतात/नाही गावायची कोंबडी /पण दंगल केवढी!'' हे अनैसर्गिक दर्शनच बळजबरीने करता येते.तिच्या इच्छा होते, तेव्हा कोठलाच कोंबडा नसतो. 'घोडा' कवितेत ही कामतृष्णा जागृत होते. कामज्वराने ती भाजी विकणरी स्त्री पुरूषाला जास्तीची भाजी देते : ''काय करावे कळत नाही/हळूहळू घोडा काढतो बाहेर/आपले सगळे शरीर/साऱ्या बायकांची तिकडे नजर/तोंडानं पदर चावतात/सगळी मुंबई लोंबत खालती/चोरून मालती पाहतेय/बडवतो छाती आपली आपण/डोळ्यांना ढापणं वर त्याच्या/चुकून टाकते पिवीत राधा/ दोन ग्रॅम जादा डबडबी.'' मंडईतील हे दृश्य. घोड्याच्या माध्यमातून पुरूषाचे निलाजरेपण दाखविले आहे.

कोलटकर नर–मादी यावर थांबत नाहीत, योनिभेदावर प्रकाश टाकतात. पशू आणि मनुष्य या योनीत पशुयोनी उजवी वाटते, कारण पशूमध्ये नैसर्गिक मोकळेपणा असतो. त्यांना कोणत्याही गोष्टीसाठी अडून बसावे लागत नाही. बाळंतपणात मादीपशूला सुईन लागत नाही आणि नराला नरपणा हुकमतीने दाखवावा लागतो. ''वाघ आहेस हे सिध्द कर आधी/मग चाटेल ती/ तुझं अंग/ शहाण्याने व्हा बाजूला वेगळे/ बाकी सगळे/ डिंक लाडू!'' पशूत मादी सहज लाभत नाही कर्तृत्वाने ती मिळवावी लागते. मनुष्ययोनीत मात्र पैसा, अधिकार केवळ पुरूष असल्याने मादी मिळते. कोलटकरांच्या कवितेत येणारी स्त्री, ''आत्मशोधाच्या वाटेवर उभे असलेले हे स्त्रीरूप आहे. मुख्य म्हणजे, ''वर्तमानकालीन स्त्रियांच्या जागृतीशी मिळते–जुळते असे स्त्रीरूप आहे. आपण आपल्याला टाकून कसे चालेल, हा तिला व्यक्तिकेंद्री पवित्रा वर्तमान स्थितीत सुसंगत ठरतो. आपल्या स्व ची स्वच्छ जाणीव या स्त्रीरूपाला झाली आहे. सर्जनाचा कंद असलेली वासना, कामभावना मात्र या सत्वाशी तिने निगडीत केली आहे. आंतरिक कामेच्छांची व वासनांची ताकद तिला मिळत आहे. इंद्राला वश करणारे सामर्थ्य तिच्यात आहे. हे सामर्थ्य म्हणजे, तिच्या आदिम कामभाव होय.'' (एकनाथ पगार, जून 2004 : 36)

## स्त्रीचे कालजयी दु:ख :

कोलटकरांच्या काव्यात उदारवृत्ती अपार करूणा आणि सूक्ष्म तिर्यकशैली या त्रिकुटातून स्त्रियांच्या वेदनेविषयी, तिच्या दु:ख–व्यथेविषयी, संस्कृतीच्या नांदीपासून तिच्यावर होत असलेल्या जुलुमाविष्वी त्यांनी जे काव्यगत आविष्कार केले आहेत; ते एका कवीकडून क्वचितच झाले आहेत. चिरीमिरी, द्रोण, भिजकी वही या संग्रहात आलेले स्त्रीदु:ख कालजयी आहे. मानवी संस्कृतीमध्ये पराक्रमाने मोठ्या नसणाऱ्या स्त्रिया अजरामर झाल्या, त्या त्यांच्यातिल जुलमामुळे व त्यांच्या दु:खामुळे. स्त्रीचे दु:ख जाणऱ्याला कोलटकर देवसमान मानतात. 'चिरीमिरी' मधला भडवा बळवंतबुवा 107 रांडांना घेऊन पंढरपूरला जातो. तो 107 मध्ये आठवा आहे. सर्व सुखे भोगून इंद्रियसुखात न सडणारा हा आठवा. त्यांच्यातला एक झाल्याने त्यांची संवेदना त्याला मिळते; पण तो मुळच्या संशयाचा आहे. 'वामांगी' कवितेमध्ये युगानुयुगे नाकापुढे पाहून चालणाऱ्या रूक्मिणीच्या डाव्या हाताला विठ्ठल नसल्याचे सांगतो. रूक्मिणीचे दु:ख ''आषाढी कार्तिकीला/इतके लोक येतात नेहमी/ मला कधी कुणी सांगितलं नाही'' असं आहे. आषाढी–कार्तिकीला स्त्री–पुरूषांची प्रचंड गर्दी उसळते. त्यात विठोबा गेला कुठे, हे समानधर्मी पुरूष रूक्मिणीला सांगत नाहीत. बळवंतबुवा 107 रांडा घेऊन खुलेआम फिरणारा, म्हणून त्याला तिचे एकटेपणा दिसते : ''म्हणते नाकासमोर/ बघण्यात जन्म गेला/ बाजूचं मला जरा/कमीच दिसतं/दगडासारखी झाली/ मान अगदी धरली बघ/इकडची तिकडं/जरा होत नाही/ आज एकदम मला/ भेटायला धावून आलं/ अठ्ठाविस युगाचं/ एकटेपणा उंच टाचा करून/ मागं विटेवर उभा/ कसा बघतोय बघा/ विठ्ठल मेला!'' अरूण कोलटकरांना रूखमाईचे अठ्ठावीस युगांचे एकटेपण दिसते. त्यांच्या प्रदीप्त प्रतिभेने संसारातील प्रश्नांची उकल करून स्त्रीदु:खाचे खोलवर दर्शन घडविले आहे. विठ्ठलाला लौकिकातला लंटपट? ठरविले आहे. तो देव असला म्हणून काय झालं ; तोही एक पुरूषच!

स्त्रीला काचणारे आणि मरणासन्न करणारे दु:ख म्हणजे अपत्याचे ते झाल्यानंतर आलेल्या प्रतिकूलतेतही दु:खानुभव येतो आणि ते न होण्यानं होणाऱ्या अवहेलनेतही कातीव दु:खाची सोबत राहते. लहानग्या अपत्याची ताटातुट म्हणजे मातृत्वाची विटंबनाच असते. हे तिचे दु:ख तिच्या लौकिक अस्तित्वाला नि भावविश्वाला व्यापून स्वाभाविक जगण्याचा संकोच करते. मेरी आणि तिचा मुलगा येशू यांच्याबाबतीत हेच घडले. येशूची वयाच्या 12 व्या वर्षी आईपासून ताटातूट होते. त्रिमेरी–1 या मालिकेत कविने अशा अभागिनीचे दु:ख दाखविले आहे. मुलाचा धोसरा घेऊन आई खंगते. मुलाच्या भेटीसाठी ती आसुसलेली, अधीर झालेली आहे : ''मी बेवारशी कुत्री जरी असते/ तुझ्या टेबलाखाली घुटमळणारी/ तरी तुझा प्रेमळ हात/ माझ्या डोक्यावरून तू फिरवला असता/ खाली पडलेले चार कण तरी निदान/ मला मिळाले असते/ तू मोडलेल्या भाकरीचे/ पण मी फक्त आई होते तुझी/ तुझ्या हस्तस्पर्शाला/ तुझ्या तोंडच्या उष्ट्या शब्दाला/किंवा प्रेमळ दृष्टिक्षेपालाही/ वंचित झालेली'' ही एका मातेची वेदना आहे. साऱ्या जगाला प्रेमाचा, दयेचा संदेश देणाऱ्या येशूची आई त्याला वात्सल्याने कवटाळूही शकली नाही. तिच्या कसलाही गुन्हा नव्हता. ती वयात आलेली नसताना कुमारी माता झाली. ती आंधळी, शिंदळी, कलाल, कोळी, कुलकर्णी, कनानी, महारोगी, भूतबाधित अशा कोठल्याही विकाराने त्रस्त नव्हती; तरीही तिचा संसर्ग होऊ नये म्हणून मुलाला तिच्यापासून तोडले. पण पाखंडांनी येशूला मृत्यूदंड दिला. छिन्नविच्छिन्न देह क्रुसावरून काढला, तेव्हाही मातेला दर्शन घेता आले नाही. त्या घटनेनंतर पंधराशे वर्षांनी मायकेल एंजेलोला

तिची दया आली त्याने मृत्यूदंडानंतर मातेच्या कुशीत विसावलेला येशू दाखविला आहे. मायकेल ऐंजेलोच्या चित्रशिल्पापेक्षा अरूण कोलटकरांची निर्मिती अतिभव्य आणि उत्तुंग वाटते. चित्रशिल्पात एंजेलोचे कारूण्य प्रकटले आहे, तर कवितेत कोलटकरांचे वात्सल्य आविष्कृत झाले आहे. मेरीच्या मुक्या भावनांना शब्द फुटले आहेत. इथे मात्र कोलटकर तटस्थ दिसत नाहीत. मुक्या भावनांना शब्द फुटले आहेत. इथे मात्र कोलटकर तटस्थ दिसत नाहीत. भावनिक ओलावा आला; याला वात्सल्य हेच कारण आहे. साऱ्या जगावर शांती, प्रेम, माया, ममता यांची खैरात करणारा प्रेषित आपल्या जन्मदात्रीला विन्मुख करतो. देवतुल्य, देवरूप पुरूषही आपल्या आईचे का होईना– पण एका स्त्रीचे शोषण करतोच, हा कोलटकरांचा अन्वयार्थ आहे.

कसांड्रा शापित, बंदिवासात जगते. या स्वाभीमानी स्त्रीला धडा शिकवण्याची दैवी पध्दत म्हणजे अपोलोचे तिच्या तोंडात थुंकणे. पुरूष यापेक्षा आणखी वेगळे असे काय काय देणार स्त्रीला! ती विदुषी असणंही पुरूषाला सहन होत नाही, विपाशा गणिती होती. विपाशा विव्दान गणिती होती म्हणून : ''भर रस्त्यात नागवं केलं त्यांनी / षंढनीतीच्या / सनातन नियमांना अनुसरून / ऑगस्टसची जागा येशूनं घेतली / तरी अजून / सीझोरियन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या / मुख्य चर्चमध्ये / म्हणजे कॅथेड्रलमध्ये अलेक्झांड्रियाच्या / फरफटत नेलं तुला त्यांनी / आणि बोरूसारखं सोलू काढलं / अक्षरशः कालवांच्या धारदार शिंपल्यांनी / खरचं हवा होता काय येशूला / हा अघोरी नैवेद्य / एका ज्ञानयोगिनीच्या कुमारिल्ल मांसाचा'' (विपाशा)–अतिप्रगत ग्रीकमधील ही स्थिती! 'कुमारी' ज्ञानयोगिनी मांसाचे नैवेद्य हवे पुरूषांना, भर चौकात तिला नागवे केले. आपल्याकडेही द्रौपदीचे न्यायसभेपुढेच वस्त्रहरण नव्हते का केले? असे भयंकर क्रौर्य मांसाहारी पशूही करीत नाहीत; पण मानवी पुरूषी संस्कृतीच्या इतिहासात त्याचे दाखले आहेत.

मैनुने कुळाचार सोडून प्रेमविवाह करते, म्हणून तिच्यावर सामूहिक बलात्कार होतो (आज ऑनर किलिंग होते). कोलटकरांनी या प्रसंगी ठोकलेले शब्दखिळे अजरामर होतील : '' हुकाला टांबलेली बकरी / आणि कुलाचार सोडलेली / लाज गुंडाळून ठेवलेली / बहिण / यांच्यात फरक करत नाही सुरी / माझी तरी!'' कोलटकरांनी संस्कृतीच्या इतिहासाला उभे–आडवे छेद देऊन रक्तलांच्छित नव्हे; तर अमानुष इतिहास, अमानुष पुरूषी वर्चस्वाची संस्कृती मांसाच्या दुर्गंधाने घाण झाल्याने दाखवून दिले आहे. स्त्रीच्या करूणेवर जग उभे आहे; पण पुरूषी त्या कारूण्याचे निर्दयीपणे शोषण करतो.

हाडम्मा आपले बंड पुकारत. मागणीनुसार, इच्छा नसतांनाही मुलं उत्पन्न करण्याची फॅक्टरी नाकारते. परंपरेने सोलून काढलेल्या स्त्रीचे हे पहिले बंड म्हणायला पाहिजे.

अरूण कोलटकरांची सविता कपोकल्पिताचा प्रदेशात जाते आणि विश्वात्म होते. त्यांनी योजलेली मिथकं जरी पाहिली, तरी त्यांच्या वैश्विक भानाची होते कल्पना करता येते. कोलटकरांची रसिकता अनेक विणीची आहे. अनेक स्फुल्लिंगे, अनेक अवधाने आणि मूळच्या रसिकता एकंदर मानवी इतिहासाची ओढ कोलटकरांना असलेली दिसून येते. मानवाची मृतिशीलता, सर्जनशीलता आणि परस्परांतील संबंध–व्यवहार हा त्यांच्या चिंतनाचा मूळ गाभा आहे. मानवी संस्कृतीत मिथकांना महत्त्व आहे. मिथकं अशास्त्रीय कार्यकारभावातून निर्माण होतात. साप, कावळा, नाल, बाहुला, प्रेषित, सर्पमित्र, पाप, पुण्य अशी मिथके येतात. ही मिथेक पूर्वापार काळापासून आपल्या जगण्याला आधार देत आली आहेत. या मिथकांतून संबंध मानवी संस्कृती एक असल्याचे पटते. म्हणून त्यांची सुख दुःखेही सारखीच असतात. अरूण कोल्टकर या अफाट प्रदेशाच्या मराठीच्या अटोळ्यावर उभे राहून विश्वसंस्कृतीच्या जागल्याचे काम करीत असल्याचे दिसून येते.